**सत्र खटला क्र.१३८/२०१५.**

**सरकार वि. प्रेमलाल ऊर्फ प्रेमा यादव व इतर.**

**निशानी क्र. ४१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | धनराज देविदास तलवारे. |
| वय | – | ४० वर्ष |
| व्यवसाय | – | वनपाल. |
| पत्ता | – | चामोर्शी, जि. गडचिरोली. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकिल श्री. व्ही.डी.हुकरे मार्फत शपथेवर सुरु** –

1. दि.०४.०४.२०१७ रोजी मी वनक्षेत्र पवनी येथे कार्यरत होतो. पोलिसांनी माझे कार्यालयाला पत्र दिले व दोन कर्मचारी पंच म्हणुन पाठविण्याबद्दल सांगितले. आता मला जे समन्स दाखविले त्यावर माझी सही आहे. ते **निशानी क्र.४२** वर आहे. मी त्याचदिवशी दुपारी १२.०० नंतर पोलिस स्टेशनला हजर झालो. तिथे ठाणेदार यांनी आरोपीला बोलविले आणि आमचेसमोर विचारपुस केली. आता मला आरोपीचे नाव आठवत नाही. त्याचा चेहरादेखील स्पष्टपणे आठवत नाही. आरोपीने पोलिसांना काही तरी सांगितले. काय सांगितले ते आज मला आठवत नाही. पोलिसांनी तो मजकुर टाईप करुन घेतला. त्यावर माझी व माझा सहकारी सही घेतली. तसेच ज्याने माहिती दिली त्याची सही घेतली. आता मला जे कबुली निवेदन दाखविले त्यावर माझी सही आहे. मी वाचुन बघीतले तर मला माहिती आठवु शकते. (साक्षीदाराने कबुली निवेदन वाचले.) त्या व्यक्तीने बंदुकीबद्दल पोलिसांना माहिती दिली होती. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनाने जंगलाचा दिशेने गेलो. आम्ही दोघे पंच, आरोपी, ठाणेदार आणि इतर लोक होते. आम्ही देवलापारकडुन पवनीकडे गेलो. कोण रस्ता दाखवित होता हे मला आठवत नाही. आम्ही जंगलात गेलो. आरोपीने एका ठिकाणाहुन मातीमध्ये लपवलेली बंदुक काढुन दिली. त्यासोबत दोन गोळया होत्या. ती काळपट रंगाची

स्टीलसारखी होती. पोलिसांनी ती बंदुक आणि गोळया जप्त केल्या. कापडामध्ये गुंडाळुन पॅक केली आणि त्यावर सिल लावले. झालेल्या कार्यवाहीचा पंचनामा पोलिसांनी तयार केला त्यावर माझी सही घेतली. आता मला जो जप्ती पंचनामा दाखविला तो तोच आहे. त्यावर मी, दुसरा पंच यांच्या सहया आहेत. तो **निशानी क्र.४३** वर आहे. पोलिस पाण्याचा डबक्यामध्ये गेले होते तिथे कसलातरी शोध घेतला. मला जी बंदुक दाखविली ती माझेसमोर जप्त केली होती काय हे मला आठवत नाही. त्याला लागलेल्या सिलवर माझी सही आहे. त्या सिलला **आर्टीकल–ए१** देण्यात आले. आता मला ज्या गोळया दाखविल्या तशाच गोळया जप्त केल्या होत्या. त्याला लागलेल्या सिलवर माझी सही आहे. त्या सिलला **आर्टीकल–ए२** देण्यात आल्या. जप्तीचा ठिकाणी फोटो काढण्यात आले होते. आता मला जे फोटो दाखविले त्यामध्ये मी दिसत आहे.

**उलटतपासणी आरोपींचे वकिल श्री. आर. के. तिवारी मार्फत –**

2. माझे कार्यालय देवलापार पोलिस स्टेशनपासुन ४–५ किलोमीटर अंतरावर आहे. पोलिस स्टेशन जवळ इतर शासकीय कार्यालय आहेत. पोलिसांनी ऑफीसमध्ये पंच देण्याबाबत मागणी केली त्यावेळी मी कार्यालयात नव्हतो. माझा वरिष्ठांनी फोन करुन मला पोलिस स्टेशनला जा असे सांगितले. त्यावेळी मी माझा मुख्यालयात हजर होतो. मला फोन किती वाजता आला ते मला सांगता येत नाही. पोलिसांनी समन्सवर माझी कुठे सही घेतली हे मला आठवत नाही.

3. ज्या जंगलात आम्ही गेलो होतो त्या भागात माझी डयुटी नव्हती. पोलिस स्टेशनपासुन जंगलाचे अंतर मला सांगता येत नाही. ज्या ठिकाणी आम्ही गेलो तो जंगलाचा भाग कोअर फॉरेस्ट अंतर्गत येतो. त्या भागात जाण्यापुर्वी पोलिसांनी वन विभागाची परवानगी घेतली नव्हती. त्या भागात नियुक्तीस असलेला वन कर्मचारी आमचेसोबत नव्हता. कोअर जंगलात गार्ड किंवा गाईड असल्याशिवाय वाहनाबाहेर येता येत नाही. गाडीतुन उतरल्यावर आम्ही ५–१० मिनिट पाया चालत गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गेलो त्याठिकाणी २ पोलिस कर्मचारी हजर होते. पुर्ण कार्यवाही करायला किती वेळ लागला हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की,

मी सर्व पंचनाम्यांवर पोलिस स्टेशनला सहया केल्या. आम्ही पोलिस स्टेशनला पोहोचलो त्यावेळी सायंकाळ झाली होती. जंगलाचा बाहेर पडलो त्यावेळी सायंकाळ झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगण्याप्रमाणे मी सर्व पंचनाम्यांवर पोलिस स्टेशनला बसुन सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी पोहोचण्यापुर्वी पोलिसांजवळ पिस्तुल होती. हे म्हणणे खरे नाही की, जंगलात जातांना आणि येतांना फॉरेस्ट गेटमधुन जावे लागते. पंचनाम्यात जर तसे लिहिले असेल तर ते चुकीचे आहे. फॉरेस्ट गेटला नोंद करुन जंगलाचा आत जावे लागते. आम्ही गेलो त्यावेळी फॉरेस्ट गेटवर नोंद करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांसोबत जंगलात गेलो नाही आणि कोणतीही वस्तु माझेसमक्ष जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व फोटो जंगलाचा बाहेर काढले आहेत. फोटोंमध्ये माळरानासारखा भाग दिसतो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

नागपूर
दि.२४.०४.२०२६.

(एम.एस.गणोरकर)
अति. सत्र न्यायाधिश – ६,
नागपूर.